ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

ENGLISH / MARATHI / HINDI

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Pune-67

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २५ | शेतीची भुमिका व आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे शेती संबंधित केलेल्या तरतुदी<br>**मारुती भिमराव कांबळे**<br>**डॉ. मिनाक्षी जाधव** | १२०-१२४ |
| २६ | कोरोना कालखंडातील स्त्री-पुरुषांमधील ताण-तणावातील फरक अभ्यासणे व त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे<br>**अडसरे विष्णू बाळशिराम** | १२५-१२७ |
| २७ | महात्मा गांधी यांची ग्राम स्वराज्य संकल्पना आणि आत्मनिर्भर भारत<br>**प्रा. सांगळे भाऊसाहेब खंडू** | १२८-१३० |
| २८ | आत्मनिर्भर भारत या संकल्पनेसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनातून लावलेला अन्वयार्थ एक अभ्यास<br>**विजयकुमार वावळे** | १३१-१३४ |
| २९ | आत्मनिर्भर भारत, वस्तुस्थिती, संधी आणि आव्हाने<br>**प्रा. डॉ. सीमा चव्हाण**<br>**विकास गोधाजी अंत्रे** | १३५-१४१ |



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २५. शेतीची भुमिका व आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे शेती संबंधित केलेल्या तरतुदी

**मारुती भिमराव कांबळे**
संशोधक विद्यार्थी
**डॉ. मिनाक्षी जाधव**
प्रो. रामकृष्ण मोरे आर्ट, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय, आकुर्डी पूणे.

## प्रस्तावना

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मागील सहा दशकात उद्योगांना महत्त्व देण्यात आले. तरी भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे स्थान महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा कमी होत असला, तरी अजूनही शेती क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. भारताचा भुप्रदेश विस्तीर्ण शेती व्यवसाय अनुकूल असल्याने शेती व बरोबरच पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय सारखे पूरक व्यवसाय वाढल्याचे दिसून येते. थोडक्यात शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताने स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजना आणि त्याद्वारे विकासाचे धोरण अवलंबले. त्यानुसार पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी विकासावर व अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण तेवर भर देण्यात आले. पहिल्या पंचवार्षिक योजनेत स्वयंपूर्णते कडे वाटचाल झाली होती ती मागे पडली. सतत पडणारे दुष्काळ आणि नापिकी च्या पार्श्वभूमीवर एकाधिकार योजना सार्वजनिक वितरण प्रणाली आणि अत्यावश्यक वस्तू कायद्या सारखे कायदे राबविण्यात आले होते. तर आत्मनिर्भर भारत द्वारे कृषी क्षेत्रासाठीच्या पायाभूत सुविधांसाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "आत्मनिर्भर भारत" या अभियानाची घोषणा केलेली आहे. "आत्मनिर्भर भारत" ही एक मोठी आर्थिक योजना म्हणावे लागेल. आत्मनिर्भर भारत अभियान दिनांक 12 मे 2020 रोजी सुरू करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीर केलेल्या आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे वीस लाख कोटी रुपयांच्या आर्थिक पॅकेज शेती आणि शेतीच्या निगडित व्यवसायासाठी पायाभूत सुविधांच्या आर्थिक विकासासाठी अर्थमंत्र्यांनी घोषणा केली सरकारने शेती संबंधित पायाभूत सुविधांसाठी एक लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## ग्रहीतक

1. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राची भूमिका वाढली आहे.
2. आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे शेती संबंधित क्षेत्रासाठी मोठ्याप्रमाणात तरतुदी करण्यात आल्या आहेत.

## उद्दिष्टे

भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राची भुमिका पाहणे.

आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे शेती आणि शेतीशी संबंधित केलेल्या तरतुदीचा आढावा घेणे.



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

140

**अभ्यासाचे महत्त्व**

जगात भारत हा सर्वात मोठा कृषी उत्पादक देश आहे. मसाल्याचे पदार्थ, डाळी आणि दुग्ध उत्पादन तसेच कापूस, गहू, तांदूळ यांचे मोठे क्षेत्र भारतात आहे. काही दशकांपूर्वी भारताच्या जीडीपी मध्ये शेतीचा वाटा **75 %** होता. तो आता **13 %** पर्यंत खाली आले आहे. परंतु एकूण श्रमिक कामगार लोकसंख्ये पैकी सुमारे **46 %** लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. थोडक्यात शेती हा एक मोठा उद्योग आहे. आणि शेती क्षेत्राचा देशातील प्रत्येक नागरिकावर त्याचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष प्रभाव पडतो. याचकार अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भरता प्राप्त केल्या शिवाय कोणत्याही देश आर्थिक विकासाची कल्पना करू शकत नाही, असे प्रो. शुल्टझ यांचे मत आहे. यावरून कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासातील अन्नधान्य उत्पादनाचे व पर्यायाने कृषी क्षेत्राचे महत्त्व वाढले आहे. हेच विचारात घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 12 मे 2020 रोजी आत्मनिर्भर भारत योजना सुरुवात केली आणि कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांत वाढ घडवून आणण्यासाठी एक लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तरी शेती आणि शेती संबंधित विविध तरतुदी करून शेती क्षेत्रात आत्मनिर्भरता प्राप्त होण्यासाठी मोठ्या प्रमाणात तरतुदी करण्यात आल्या आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राची भुमिका व कृषी क्षेत्राच्या निगडित सुधारनांसाठी केलेल्या तरतुदीचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राची भुमिक**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मागील सहा दशकात उद्योगांना महत्त्व देण्यात आले. तरी भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे स्थान महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा कमी होत असला, तरी अजूनही शेती क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. भारताचा भूप्रदेश विस्तीर्ण शेती व्यवसाय अनुकूल असल्याने शेती व शेती बरोबरच पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय सारखे पूरक व्यवसाय वाढल्याचे दिसून येते. थोडक्यात शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आहे.

**1. राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा**

सन **1950 -51** मध्ये शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा **56.6**टक्के होता. तो 1990-91 मध्ये **34** टक्के पर्यंत झाला. **2013-14** मध्ये तो वाटा 13.09 टक्के इतका होता. **2017-18** मध्ये तो 17.1 टक्के राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा आहे

**2. भारतीय शेती व रोजगाराचे स्थान**

भारतीय शेती क्षेत्रातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारे रोजगार निर्माण मध्ये एकूण श्रमिकांच्या **70** टक्के श्रमिक शेती क्षेत्रात कार्यरत होते. ग्रामीण भागात पुरेसे औद्योगीकरण झालेले नसल्याने बहुतेक लोकांना आपली उपजीविका शेतीवरच भागवावी लागते आहे. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण 1950-51 मध्ये **70** टक्के श्रमिक शेतीवर अवलंबून होते, तर **2011** मध्ये **54.6** टक्के श्रमिकांना कृषी क्षेत्रावर रोजगार प्राप्त झाला.

**3. औद्योगिक विकासास सहाय्य**

भारतातील विविध उद्योगांना लागणारा कच्चामाल शेतीतून उपलब्ध होतो. कापड, ताग, साखर उद्योग उद्योग इत्यादींचा समावेश होतो. याशिवाय अनेक लघुउद्योग, कुटिर उद्योग, हातमाग उद्योग, शेतमाल प्रक्रिया



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

141

प्रक्रिया उद्योग शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. जसे हातमाग, तेल गिरण्या, भात गिरण्या, कागद उद्योग, डाळ डाळ मिल इत्यादी. या उद्योगात शेतमालाचा कच्चा माल म्हणून उपयोग केला जातो. सध्या अन्नधान्य प्रक्रिया उद्योगाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रात निर्माण होणारी शेती अवजारे, रासायनिक खते, मळणी यंत्रे, पाईप, ट्रॅक्टर, कीटकनाशके इत्यादींना शेती क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात मागणी येते. या सर्व उद्योगांचा विकास शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे औद्योगिक विकासात शेतीला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**4. आंतरराष्ट्रीय व्यापारात शेती क्षेत्राचे महत्व**

आंतरराष्ट्रीय व्यापारात शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. जसे चहा, साखर, तंबाखू, फळे, भाजीपाला, फुले, मसाल्याचे पदार्थ, मासे इत्यादी निर्यात भारतातून मोठ्या प्रमाणात होत असून भारताला परकीय चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहे. भारतीय शेतीचा निर्यात व्यापारात कच्चा वस्तूंचा ५० टक्के वाटा आहे. तर पक्क्या वस्तूंचा **20** टक्के वाटा आहे. देशाच्या एकूण निर्यातीत **70** टक्के वाटा शेतीशी संबंधित असल्याने निर्यात वाढीसाठी शेती व्यवसायाचे अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. एकूण निर्यातीत **1990-91** मध्ये भारताचा शेतमाल निर्यात तिचा हिस्सा **18.5** टक्के होता

**5. पशुधनाचा विकास**

भारतात पशुधन मोठ्या प्रमाणात आहे. भारताच्या ग्रामीण भागात शेती व्यवसायिक पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, मेंढी पालन, बकरी पालन, वराह पालन, इमू पालन इत्यादी सारखे व्यवसाय केले जातात. या पूरक व्यवसायाचा विकास मुख्यत्वे शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो. शेतकरी वर्गाला उत्पन्नाचा एक महत्वाचा स्त्रोत म्हणून पशुधन महत्त्वाचे ठरते. त्यासाठी आवश्यक असणारा सर्व प्रकारचा चारा शेती क्षेत्रातून उपलब्ध होतो.

**6. अन्नधान्याचा पुरवठा**

भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे, त्यामुळे अन्नधान्याची मागणी वाढत आहे. त्यासाठी अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण होणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षात देशाने अन्नधान्याची स्वयंपूर्णता प्राप्त केली आहे. तसेच काही प्रमाणात अन्नधान्याचे निर्यात सुद्धा केलेली आहे. सन **1950-51** मध्ये एकूण अन्नधान्याचे उत्पादन **50.1** टक्के दशलक्ष टन होते, ते **2011-12** पर्यंत **257**.32 दशलक्ष टनांपर्यंत वाढले, तर **2016-17** मध्ये ते **275. 68** दशलक्ष टन झाले.

**7. भांडवल निर्मितीला योगदान**

भारतासारख्या विकसनशील देशात भांडवल निर्मिती शेती क्षेत्रातून अत्यंत महत्वपूर्ण भर घातली जाते. विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात शेतीक्षेत्र भांडवल निर्मिती कमी पडल्यास विकास मागे पडू शकतो. जगातील अनेक देशांनी शेती अधिक याची गुंतवणूक करून आपला आर्थिक विकास केला आहे.

**8. उत्पादनाचे साधन**

भारतीय अर्थव्यवस्थेत ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महानगरपालिका, राज्य सरकार व केंद्र सरकार या संस्थांना आपला खर्च भागविण्यासाठी शेती क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते उदा. पाणीपट्टी, जमीन महसूल, विक्रीकर, शहरी मालावरील जकात इत्यादी. त्याबरोबर शेतीआधारित उत्पादनावर प्राप्तिकर, शिक्षण कर, निर्यात कर, स्टॅम्प ड्युटी, व रजिस्ट्रेशन फी पासून चे उत्पन्न सरकारला मिळते.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे कृषी क्षेत्रासाठी केलेल्या विविध तरतुदी

**1.** शेतीशी संबंधित पायाभूत सुविधांसाठी एक लाख कोटी रुपयांची योजना.

यामध्ये शेतीशी निगडित लॉजिस्टिक, शेतीमालाची साठवणूक क्षमता, कोल्डचेन, प्राथमिक शेती सोसायटी, कृषीशी निगडित स्टार्ट अप इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे.

**2.** शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या छोट्या उद्योगांसाठी मदत

विविध राज्यांमधील स्थानिक पिक रचनेनुसार क्लस्टर तयार केले जाणार. ऑरगॅनिक आणि हर्बल उत्पादकांना प्रोत्साहन. यात पोषण आणि आरोग्यदायी उत्पादनांना ही प्रोत्साहन देणार यामुळे दोन लाख छोट्या कंपन्यांना लाभ होणार यासाठी **10,000** कोटी रुपयांची तरतूद.

**3.** प्रधानमंत्री मत्स्यपालन योजनेअंतर्गत मासेमारी आणि मत्स्य पालनासाठी 20,000 कोटी

**4. 10,000** कोटी रुपयांची तरतूद मासेमारी आणि मत्स्य पालना साठी.

**5. 9000** कोटी रुपयांची तरतूद बोटींसाठी विमा योजना आणली जाणार.

**6.** पशुधनासाठी लसीकरण योजना

गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या आणि इतर शेतीशी निगडित **100** टक्के लसीकरण केले जाणार असून यासाठी तब्बल **13,347** कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार.

**7.** डेअरीशी निगडीत आणि पशुपालन शी निगडीत पायाभूत सुविधा.

**15,000** कोटी रुपयांची तरतूद डेअरी व्यवसाय साठीच्या आणि पशुपालनाची निगडित पायाभूत सुविधांसाठी केले जाणार. यात खाजगी गुंतवणूक सुद्धा आकर्षित करण्यावर भर दिला जाईल. दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनासाठी आणि प्रक्रियासाठी प्रोत्साहन दिले जाणार तसेच पशुखाद्याचे उत्पादन करणाऱ्या व्यवसायिकांना देखील प्रोत्साहनदेण्याचा प्रयत्न केले जातील.

**8.** औषधी वनस्पती शेतीला प्रोत्साहन

**4000** कोटी रुपयांची तरतूद औषधी वनस्पतींच्या शेतीसाठी केली. गंगेच्या दोन्ही काठावर औषधी आणि हर्बल वनस्पतींच्या शेतीला प्रोत्साहन दिले जाणार. दहा लाख हेक्टर मध्ये या प्रकारची शेती करण्याचे उद्दिष्ट.

**9.** मधमाशी पालन योजना

मधाचे जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन यासाठी **500** कोटी रुपयांची तरतूद केले जाणार.

**10.** प्रधानमंत्री किसान फंड **18,700** कोटी रुपयांची तरतूद

11. प्रधानमंत्री फसल विमा योजनेसाठी **6400** कोटी रुपयांची तरतूद

**निष्कर्ष**

जगात भारत हा सर्वात मोठा कृषी उत्पादक देश आहे. मसाल्याचे पदार्थ, डाळी आणि दुग्ध तसेच कापूस, गहू, तांदूळ यांचे मोठे क्षेत्र भारतात आहे. काही दशकांपूर्वी भारताच्या जीडीपीमध्ये शेतीचा वाटा **75** टक्के होता, तो असा **13** टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. परंतु एकूण श्रमिक कामगार लोकसंख्येपैकी सुमारे **46** टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. थोडक्यात शेती हा एक मोठा उद्योग आहे आणि देशाच्या प्रत्येक नागरिकावर त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव पडतो. पं. दीनदयाळ



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

उपाध्याय व म. गांधी इतर अनेकांप्रमाणेच स्वदेशी आणि विकेंद्रीकरण या दोन संकल्पनांवर भर दिला होता. ही दोन्ही सूत्रे आत्मनिर्भरतेकडे नेणारीच आहेत. पंतप्रधानांनी स्थानीय उत्पादने व उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी 'लोकल' बाबत 'व्होकल' होण्यासंदर्भात केलेले आव्हनही, हीच दृष्टी अधोरेखित करणारे आहे. तेव्हा सारांशाने सांगायचे तर आत्मनिर्भरतेच्या संकल्पनेचा पंतप्रधानांनी उच्चाराने केलेला पुरस्कार, ही आपल्या पूर्वसूरींनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकेची नव्या संदर्भात केलेली मांडणी आहे, असे वर्णन केल्यास ते चुकीचे ठरू नये. 'नित्य नूतन, चिर पुरातन' हे भारतीय जीवनदृष्टीचे एक पायाभूत सूत्र आहे. व त्याचेच प्रत्यंतर मोदींच्या मांडणीतून येतो. केंद्र सरकारने देशाला आत्मनिर्भर तेकडे वाटचाल करण्यासाठी वीस लाख कोटींची तरतूद करून देशाला आत्मनिर्भर ते कडे नेण्यासाठी एक पाऊल टाकले आहे. त्यामुळे शेती आणि शेतीशी निगडित विविध घटकात गुंतवणूक करून शेती क्षेत्रात सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**संदर्भ**

1. www.vikaspedia.in
2. www.thehindu.com
3. www.agrostar.in
4. www. esakal.com
5. www.deshdoot.com
6. **प्रा. डॉ. एस.व्ही. ढमढेरे ,भारतीय आर्थिक पर्यावरण . जुलै २०१९ डायमंड पब्लिकेशन्स**

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *